कोषागारातून रोख देय अनुदान
केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत
सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी राज्य
हिश्श्याचे सर्वसाधारण घटकासाठी
अनुदान वितरीत करण्याबाबत...
(लेखाशीर्ष २२१५ २१८९)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांकः स्वभामि-१२१५/प्र.क्र.७९/पापु-१६

७ वा मजला, जी. टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ५ जानेवारी, २०१६

वाचा

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-१२१५/प्र.क्र.७९/पापु-१६, दि.२७ जुलै, २०१५.

शासन शुद्धिपत्र

या विभागाच्या उपरोक्त दि.२७ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी राज्य हिश्श्याच्या माहिती, शिक्षण व संवाद (IEC), मानवी संसाधन विकास (HRD) व प्रशासकीय बाबी या घटकांसाठी रू.३.४३ लक्ष इतका निधी राज्यस्तरावर पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्या अधिनस्त ठेवण्यात आलेला आहे.

उपरोक्त दि.२७ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २

“पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्याकडे BEAMS प्रणाली उपलब्ध नाही. यास्तव राज्य हिश्श्याच्या निधीपैकी रू.३.४३ लक्ष एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रू.३.४३ लक्ष (तीन लक्ष, त्रेचाळीस हजार फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांनी सदर रक्कम रू.३.४३ लक्ष अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरित करून स्वतंत्र धनादेशाद्वारे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी."

या ऐवजी

“केंद्र शासनाकडून वरील घटकांसाठी (IEC, HRD व प्रशासकीय बाबी) प्राप्त झालेली रू.३.४३ लक्ष एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रू.३.४३ लक्ष (रूपये तीन लक्ष,

त्रेचाळीस हजार फक्त) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा) (श्रीमती स.दि.जिरगाळे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री. शां.सि. कुदळे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा) (श्रीमती स.दि.जिरगाळे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करून ती त्यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्नंतर रू.३.४३ लक्ष एवढ्या रकमेचा स्वतंत्र धनादेश पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्याकडे सुपूर्द करावा" असा वाचण्यात यावा.

सदर शासन शुद्धिपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१११४०४०८५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Dattatray Salve

Digitally signed by Ashok Dattatray Salve
DN: CN = Ashok Dattatray Salve, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.05 12:23:22 +05'30'

(अ.द.साळवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता)
३. विभागीय आयुक्त, सर्व.
४. उपायुक्त विकास, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
५. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
८. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
९. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
१०. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
११. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा परिषद, सर्व.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१४. नियोजन विभाग, (का.क्र.१४४३) मंत्रालय, मुंबई.
१५. वित्त विभाग, (व्यय-३) मंत्रालय, मुंबई.
१६. कार्यासन क्र.पापु-०४, पापु-०८, पापु-११ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती, कार्यासन पापु-१६.